रयत शिक्षण संस्थेचे,

# आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली

दिनांक : 27 ऑगस्ट 2019

## राष्ट्रीय सेवा योजना

### पूरग्रस्त पुणदी गावामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे ग्रामस्वच्छता शिबीर

आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली) येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर पूरग्रस्त गाव मौजे पुणदी तर्फ वाळवा येथे नुकतेच सुरू झाले. दिनांक 27 ऑगस्ट 2019 रोजी पुणदी येथील कृष्णा नदीकाठाला असणारी स्मशानभूमी पूर्णपणे गाळमुक्त करून स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता, विश्रांतीच्या पायऱ्या, वडाच्या झाडाचा कट्टा व घाट परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच पुराच्या पाण्याने वाहून आलेले प्लॉस्टिक, कचरा इत्यादीची विल्हेवाट लावण्यात आली.

दुपारी 3.30 वाजता शिबीरार्थी विद्यार्थ्यांसाठी कडेगाव येथील श्रीमती बयाबाई श्रीपतीराव कदम महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे विभागप्रमुख संजय पोरे यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी आपल्या व्याख्यानामध्ये विद्यार्थी दशेत आवश्यक असणाऱ्या श्रमसंस्कार मूल्याचे महत्त्व पटवून दिले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम होते. त्यांनी दत्तक गावातील श्रमाचे महत्त्व व स्वच्छतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

**निष्पत्ती (Outcome)**

- मौजे पुणदी येथील स्मशानभूमी, विसाव्याच्या पायऱ्या व घाटपरिसर स्वच्छ झाला.
- विश्रांतीची जागा गाळमुक्त झाली, नदीवर जाणारी वाट स्वच्छ झाली.

लाभार्थी : पुणदी गावातील सर्व ग्रामस्थ







कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

प्राचार्य,
आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)